THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 1st AGUST 1867.

☞ *Separate Paging is given to this Part in order that it may be filed as a separate Compilation. The paging of this Part commenced with the Number for January 1867.*

## PART X.—Marathi Acts, &c.

### ACT No. XXX. of 1867.—Marathi.

---

इंडियाचे गवरनर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट गवरनर जनरल यांणी सन १८६७ चे ज्यून महिन्याचे १९ वे तारिखेस मंजूर केला तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं प्रसिद्ध केला असे.

## सन १८६७ चा आक्ट ३० वा.

### सरकारी कागदाचे नाण्याबाबद नियम ठरविण्या विषयीं सन १८६१. चा १९ वा आक्ट अहि तो सुधारण्या विषयीं आक्ट.

सरकारी कागदाचें नाण्याबाबद नियम ठरविण्याविषयीं सन १८६१ चा १९ वा आक्ट अहे त्या आक्टा अन्वयें चालू केलेले इंडिया सरकारचे प्रामिसरी नोटींचा (चिठ्ठ्यांचा) ऐवज त्या आक्टाचे ८ वे कलमा अन्वयें खालीं लिहिलेले ठिकाणांत मात्र मिळतो ह्मणजे ज्या शहरांतून किंवा कसब्यांतून त्या नोटी देण्यांत आल्या असतील त्या शहरांतील किंवा कसब्यांतील नोटी देण्याचे कचेरींतून किंवा कचेऱ्यांतून किंवा अडतींतून मात्र मिळतो आणि ज्या इलाक्यांत सदर्हू शहर किंवा कसबा असेल त्या इलाक्यांतील मुख्य शहरांत मिळतो यास्तव; आणि इलाक्यांतले मुख्य शहराखेरीज इतर कोणतेंही सदर्हू प्रकारचें शहर किंवा उद्देश.

कसबा सदर्हू आक्टाचे कारणासाठीं अमुक इलाक्यांतला आहे ह्मणजे इंडिया ग्याझेटांत जाहीरनामा वेळोवेळीं प्रसिद्ध करून जो इलाका इंडियाचे गवरनर जनरल इन् कौन्सिल मुकरर करतील त्या इलाक्यांतला आहे असें ठरविण्याचा अधिकार त्यांस देणे योग्य आहे यास्तव खालीं लिहिल्या प्रमाणे ठरविलें आहे.

नाण्याचे आक्टाचे कारणासाठीं कोणताही कसबा एका इलाक्यांतून दुसऱ्यांत दाखल करण्याचा अधिकार.

१. इलाक्यांतले मुख्य शहरा खेरीज ज्या कोणत्याही शहरांतून किंवा कसब्यांतून इंडिया सरकारच्या प्रामिसरी नोटी सदर्हू आक्टा अन्वयें दिल्या असतील किंवा देण्यांत येतील तें शहर किंवा कसबा या आक्टाचे कारणासाठीं जाहीरनाम्यांत लिहिलेले इलाक्यांतला आहे असें समजावें ह्मणून इंडिया ग्याझेटांत वेळोवेळीं जाहिरनामा प्रसिद्ध करून ठरविण्याचा अधिकार इंडियाचे गवरनर जनरल इन कौन्सिलास आहे. आणि सदर्हू प्रमाणे जाहिरनामा लावला ह्मणजे तें शहर किंवा कसबा जाहिरनाम्यांत लिहिलेले इलाक्यांतला आहे असें सदर्हू आक्टाचे कारणासाठीं समजावें.

हा आक्ट सन १८६१ चे १९ वे आक्टाचा भाग आहे असें समजावें.

२. हा आक्ट सन १८६१ चे सदर्हू १९ वे आक्टाचा भाग आहे असें समजून याचा अर्थ करावा.

(True Translation.)

VENAYEK WASSOODEW,

Oriental Translator to Government.

Printed and Published for Government at the Bombay Education Society's Press, Byculla.